# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
E-Mail: jtdirrom@gmail.com Web: http://mumbai.dte.org.in


**अत्यंत महत्वाचे व तातडीचे**

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३/२०२२/ ३२३६
दिनांक : 22 SEP 2022

प्रति,
प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र
विनाअनुदानीत पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था.
(मुंबई विभागा अंतर्गत)

विषयः- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये अभियांत्रिकी, औषनिमार्णशास्त्र व वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थेतील विद्यार्थ्याचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या व दुस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत

संदर्भः-
१. मा. संचालक, तंत्रशिक्षण,म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२२/८९१ दि.२२.०९.२०२२
२. मा.संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.,मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२२/८८९ दि.२२.०९.२०२२
३. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२एनजीसी/वि.सं.ब/२०२२/७०३ दि.२१.०७.२०२२
४. या कार्यालयाचे पत्र क्र. क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३/२०२२/३०४९ दि.१२.०९.२०२२

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, या विभागा अंतर्गत येणा-या अभियांत्रिकी, औषधनिर्माशास्त्र व वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम राबविणा-या विनाअनुदानीत संस्थांनी संदर्भाकिंत पत्रात दिलेल्या निर्देशानुसार आपल्या संस्थेत प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम बदल अथवा स्थलांतराने संस्थाबदल करावयाचा असल्यास तसेच दुस-या व तिस-या वर्षानंतर संस्था बदल करावयाचे असल्यास **संदर्भीय परिपत्रकात दिलेल्या निर्देशाचे पालन करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.**

त्याबाबतच्या सूचना संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या होत्या त्या नमुद संस्था व पाठयक्रम बदलासाठी विद्यार्थ्यांना **अर्ज करण्यासाठी दि.३०.०९.२०२२** पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली असून सदर दि.३०.०९.२०२२ पर्यत प्राप्त अर्ज या कार्यालयास पाठविण्यात यावेत.

तसेच सर्व संस्थांना असेही सूचित करण्यात येते की ज्या संस्थांनी या पुर्वी प्रस्ताव सादर केलेले आहेत अशा संस्थांनी प्रस्तावासोबत ज्या कागदपत्रांची पुर्तता करणे प्रलंबित आहेत असे कागदपत्रे वरील नमुद दिनांकापुर्वी या कार्यालयास व्यक्तीशः एकत्रितरित्या सादर करावेत. (उदाः- मागिल वर्षाची/सत्राची गुणपत्रिका, मुंबई विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र [Eligibility Certificate] व इतर कागदपत्रे)

ज्या संस्थांनी या पुर्वी प्रस्ताव सादर केलेले आहेत किंवा सादर करणार आहेत अशा संस्थांचे प्रस्ताव परिपुर्ण नसल्यास ते दप्तरी दाखल करण्यात येतील याची सर्व संस्थांनी नोद घ्यावी.

सोबत :- संदर्भ क्र.१ची प्रत

(जे.आर. निखाडे)
सहा.संचालक (तांत्रिक)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई-५१.

प्रत :- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहिती करीता
२. प्रोग्रॅमर, सर्व संस्थांना सदरचे पत्र ई-मेल व्दारे पाठविण्यात यावे

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र-पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३

ई-मेल-desk2@dte.maharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२२/ ८९१ दिनांक : 22 SEP 2022

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : १) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२२/८८९, दि.२२.०९.२०२२
२) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२२/८७७, दि.१६.०९.२०२२
२) या संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२२/८५१, दि.०८/०९/२०२२
३) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२२/८५०, दि. ०८.०९.२०२२

विषयांकीत संदर्भीन परिपत्रक तथा पत्र पहावित.

संदर्भ क्रमांक १ अन्वये विद्यार्थ्यांना संस्था व पाठ्यक्रम बदलास अर्ज करण्यासाठी अखेरची संधी म्हणून दि.३०.०९.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यास्तव सदर मुतदवाढीस अनुसरून विषयांकीत प्रकरणी संस्था व आपले स्तरावरुन कार्यवाही करण्यासाठीची कालमर्यादा सोबतच्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार निश्चित केली आहे. तरी, प्रस्तूत प्रकरणी सोबतच्या प्रपत्रात नमूद केलेल्या कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी. सदर कार्यवाही करतांना विभागीय कार्यालय स्तरावरुन व संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी नियमांचे काटेकार पालन करावे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, माहितीसाठी सादर

१. मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर
२. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
३. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,वास्तुशास्त्र,एचएमसीटी इ. पदवी महाविद्यालये,महाराष्ट्र राज्य (संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत)
४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई

कार्यासन क्रमांक - निवड नस्तीस

# प्रपत्र अ

| अ. क्र. | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) संस्था अंतर्गत शाखा बदल /पाळी बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तनेसार शाखा बदलाची कार्यवाही करावी | दि.०१/१०/२०२२ पर्यंत किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या १ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | प्राचार्य, संबंधित संस्था यांचे स्तरावरून सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांचे मान्यतेने |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह Email द्वारे पाठविण्यात यावेत. | दि.०३/१०/२०२२ पर्यंत किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या २ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संस्था बदलीने प्रवेश देणाऱ्या संस्थेचे प्राचार्य |
| २ | अ) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठांतर्गत) | विना अनुदानित संस्थाकडून संस्था बदलाबाबत विद्यापीठा अंतर्गत प्राप्त अर्जाच्या (१—ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणा-या संस्था बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी | दि.०७/१०/२०२२ पर्यंत किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या ३ दिवस आधी यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठ बदल) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या विद्यापीठाबाहेरील प्रस्तावांची दि. २४.०४.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतूदीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव मान्यतेसाठी तंत्र शिक्षण संचालनालयास पाठविण्यात यावेत. | दि.०४/१०/२०२२ पर्यंत किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) दिनांकाच्या १ दिवस आधी यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |